MHOS040009462026

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२९६/२०२६
महेश भिमा बनसोडे वि. निरंक

## निशाणी क्रमांक १ वर आदेश

१. सदर अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ प्रमाणे हेअरशिप सर्टीफीकेट (वारस प्रमाणपत्र) मिळण्यासाठी करण्यात आला आहे. अर्जदार यांचे कथन असे की, **भिमा शिवाप्पा बनसोडे** हे दिनांक २६/०१/२०२० रोजी मौजे गुजनूर, ता. तुळजापूर, जि.धाराशिव येथे मयत झाले आहे. मयत **भिमा शिवाप्पा बनसोडे** हे अर्जदार क्र.१ ते ४ यांचे वडील आहेत. मयत **भिमा शिवाप्पा बनसोडे** यांच्या आई नामे कै. हिरकणा शिवाप्पा बनसोडे व मयत **भिमा शिवाप्पा बनसोडे** पत्नी नामे वैशाली भिमा बनसोडे ह्या यापूर्वीच मयत झालेल्या आहेत. मयत **भिमा शिवाप्पा बनसोडे** यांना अर्जदार यांच्याशिवाय अन्य कोणतेही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय व निमशासकिय कार्यालयीन कामासाठी वारस दाखल्याची आवश्यकता आहे. सबब, मयत **भिमा शिवाप्पा बनसोडे** यांचे वारस म्हणून अर्जदार यांनी वारस दाखला देण्याची विनंती केली आहे.

२. मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्या सिविल मॅन्युअल चॅप्टर १९ पॅ. ३३७ प्रमाणे वारस दाखल्याच्या बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ मधील अर्जांबद्दल ज्युडिशिअल इन्क्वायरी करणे अपेक्षित आहे. तसेच फक्त हेअरशिप सर्टीफिकेटमार्फत मयताच्या मिळकतीत कोणताही मालकी हक्क उद्घोषीत होत नाही असा कायदा आहे.

३. सदर अर्जाबद्दल वर्तमानपत्रात जाहीर नोटीस काढुन व जाहीरनामा

उदघोषित करुन, अर्जाबद्दल आक्षेप असल्यास कोर्टात हजर करण्याचा हुकूम पारित करण्यात आला. तसेच मयत यांच्या हिंदु वारसा कायदयाप्रमाणे कायदेशिर वारस याबद्दल माहिती देण्यास अर्जदार यांस निर्देश देण्यात आला. त्याप्रमाणे ''दैनिक संघर्ष समाजवादाचा, धाराशिव'' या वर्तमानपत्रामध्ये दिनांक ०७/०५/२०२६ जाहीर नोटीस (नि.क्र.०८ कडे) काढण्यात आली. असे असूनही अदयाप कोर्टासमक्ष, सदर अर्जास कोणतेही आक्षेप सादर नाही.

४. अभिलेखावर अर्जदार यांनी मयत **भिमा शिवाप्पा बनसोडे** यांचा मृत्यू दाखला (नि.क्र.४/१ कडे) व मयत **भिमा शिवाप्पा बनसोडे** यांच्या पत्नी वैशाली भिमा बनसोडे यांचा मृत्यू दाखला (नि.क्र.४/२ कडे) दाखल केलेला आहे. त्याचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की,**भिमा शिवाप्पा बनसोडे** हे मौजे गुजनूर, ता. तुळजापूर, जि.धाराशिव येथे मयत झाले असून, ते कायमचे मौजे दहिटणा, ता. तुळजापूर, जि.धाराशिव येथील रहिवासी होते. अर्जदार यांच्या आधार कार्डची व्हेरीफाईड प्रती (नि.क्र.४/३ ते ४/६ सोबत एकत्रीतपणे) सादर केली आहे.

५. अर्जास पृष्ठार्थ प्रतिज्ञापत्र अर्जदार क्र.१ महेश भिमा बनसोडे यांनी सादर केले आहे. अर्जास दुजोरा देणारे अर्जदार क्र.१ महेश भिमा बनसोडे यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र (नि.क्र. ०९ कडे) दाखल आहे. तसेच साक्षीदार क्र. १ प्रतिक प्रशांत पाटील (नि.क्र.१० कडे) व साक्षीदार क्र.२ शिवाजी तुकाराम बनसोडे (नि.क्र.११ कडे) यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदार यांनी पुरावा बंद करण्याची पुरसिस (नि.क्र.१२ कडे) दाखल आहे.

६. पुराव्याचे प्रतिज्ञपत्रांचे व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत **भिमा शिवाप्पा बनसोडे** हे दिनांक २६/०१/२०२० रोजी मौजे गुजनूर, ता. तुळजापूर, जि.धाराशिव येथे मयत झाले असून ते कायमचे मौजे दहिटणा, ता. तुळजापूर, जि.धाराशिव येथील रहिवासी असल्याने त्यांच्या

मरणोत्तर त्यांची मरणसमयी जिवीत असलेले वारस हे कायदयाप्रमाणे त्यांचे वारसदार ग्राहय धरले जातात. म्हणून अर्जदार हे मयत **भिमा शिवाप्पा बनसोडे** यांचे वारस असल्याबद्दलचा पुरावा दिला असल्याने ते मयत यांचे कायदेशीर वारस दिसून येत आहेत. सबब, खालील आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ प्रमाणे **अर्जदार क्र.१ महेश भिमा बनसोडे, २.भाग्यश्री रतन कांबळे , ३. पल्लवी संदिप गुजर व ४. राजश्री वैभव शिंदे** हे मयत **भिमा शिवाप्पा बनसोडे** यांचे वारस असल्याबद्दलचा दाखला हेअरशिप सर्टीफीकेट देण्यात यावे.

३. संदर्भित कायदेशीर शुल्क अर्जदार यांनी अदा करणे.

४. अर्ज या प्रमाणे निकाली काढण्यात येत आहे.

AVINASH ANANDRAO DHOKE
Digitally signed by AVINASH ANANDRAO DHOKE
Date: 2026.08.01 17:47:30 +0530

दिनांक : ०१/०८/२०२६ (अविनाश आ. ढोके)

ठिकाण : तुळजापूर २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, तुळजापूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Anuja J. Patil |
| Court | --- | 2nd Jt.CJJD & JMFC Tuljapur |
| Date | --- | 01/08/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 01/08/2026 |
| Order uploaded on | --- | 01/08/2026 |